अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधान: " इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १९ | पुणें, बुधवार तारीख २५ नोव्हेंबर, १९५३ | अंक ४३

## विविध माहिती

**सुभाषचंद्र बोस ह्यांची इच्छा**—नेताजी सुभाषचंद्र बोस ह्यांच्या पत्नी मिसेस एमिल सेन्केल आपल्या ११ वर्षांच्या कन्येसह सध्यां व्हिएन्ना येथें राहात आहेत. कलकत्त्याचे मेयॉर श्री. बी. एन्. मुखर्जी ह्यांनीं आपल्या युरोपच्या दौर्‍यांत त्यांची गांठ घेतली असतां श्री. बोस स्वातंत्र्यप्राप्तीनंतर संन्यास घेऊं इच्छित होते, अशी माहिती मिसेस सेन्केल ह्यांनीं दिली.

**गंगेश्वर धरण पूर्ण झालें**—खानदेशमधील सिंदखेडा तालुक्यांतील गंगेश्वर धरणाचें काम पूर्ण झालें आहे. ह्या धरणाचें काम दुष्काळी भागांतील योजना म्हणून हातीं घेण्यांत आलें होतें. धरणामुळें ४,००० एकर जमिनीला पाणीपुरवठा होईल. शिरपूर तालुक्यामधील अरुणावती नदीवर बांधण्यांत येत असलेल्या करवंद धरणाचें काम चालू आहे.

**रत्नागिरी जिल्ह्यांत निरा-केंद्रें**—रत्नागिरी जिल्ह्यांत ता. १ डिसेंबरपासून ५० निरा केंद्रें चालू करण्यांत येणार आहेत. ह्या केंद्रांमुळें २०० लोकांना रोजगार मिळेल. प्रत्येक केंद्रांत ह्या धंद्याविषयीं दोन माणसांना शिक्षण देण्यांत येईल. महाराष्ट्र ग्रामोद्योग कमिटीतर्फे श्री. एस्. जी. शिधये शिक्षकाचें काम करणार आहेत.

**विजेच्या धंद्यांतील भांडवल**—भारतामधील विजेच्या धंद्यांत गुंतविलेलें एकूण भांडवल सुमारें १८·२१ कोटी रुपये आहे, असें समजतें. भांडवलापैकीं ४·७७ कोटी रुपये इतकें भांडवल परकीय मालकीचें आहे.

**मद्रास राज्याला कर्ज**—भारतीय सरकारनें मद्रास राज्य सरकारला ६·५ कोटी रुपयांचें कर्ज मंजूर केलें असल्याचें समजतें. एकूण कर्जापैकीं २·५ कोटी रुपये वैदेही आणि अमरावती नदीवरील पाटबंधार्‍यांच्या योजनांसाठीं खर्च होणार असून १·५ कोटी रुपये मेट्टुर धरणापासून काढलेल्या तलावांची सुधारणा करण्यासाठीं खर्च होणार आहेत.

**मद्रास बंदरांत नवी गोदी**—मद्रास बंदरांत एक मोठी गोदी बांधण्यासाठीं मध्यवर्ती सरकारनें राज्य सरकारला ४॥ कोटी रुपयांचें कर्ज देण्याचें ठरविलें आहे. ही गोदी बांधून झाल्यावर तींत ४ मोठ्या बोटी एकदम नांगर टाकूं शकतील.

**गव्हर्नरांची त्यागबुद्धि**—१ आक्टोबर, १९५३ रोजीं आंध्र राज्याची स्थापना झाली. तेव्हांपासून त्या नवीन राज्याचे गव्हर्नर म्हणून श्री. चंदुलाल त्रिवेदी ह्यांची नेमणूक झाली. गव्हर्नरांचा पगार दरमहा ५,५०० रुपये आहे. परंतु श्री. त्रिवेदी ह्यांनीं दरमहा १,२५० रुपयांची कपात प्रथमपासूनच स्वीकारली आहे.

**२५ हिंदी शेतकरी अमेरिकेंत जाणार**—अमेरिकेमधील शेतीचें जीवन आणि शेतीची पद्धत ह्यांचा अनुभव घेण्यासाठीं २५ हिंदी शेतकरी तरुणांना अमेरिकेंत पाठविण्याचें भारतीय सरकारनें ठरविलें आहे. हे तरूण बहुधा समाज-विकास योजनांच्या केंद्रांतून निवडण्यांत येतील. त्यांना इंग्रजी येण्याची मात्र आवश्यकता आहे. त्यांचा अमेरिकेंत ६ महिने मुक्काम राहील.

**ब्रिटिश बोलपटाचें चित्रीकरण**—ब्रिटनमधील मेफ्लॉवर प्रॉडक्शन्स ही चित्रपट कंपनी आपला एक चित्रपट सीलोनमध्यें काढण्याचा विचार करीत आहे. चित्रपटाचें नांव ' सिल्व्हर नटमेन ' असें असून मसाल्याच्या पदार्थांना तेजी आल्याच्या पार्श्वभूमीवर त्याची कथा रचलेली आहे. कादंबरीकाराचें नांव नोरा लॉफ्टस् असें आहे.

**भारताविषयीं व्याख्यानें**—अमेरिकेंतील कनेक्टिकट कॉलेजतर्फे ' भारत आणि पाश्चात्य देश ह्यांचे संबंध ' ह्या विषयावर व्याख्यानांचें एक सत्र उघडण्यांत आलें असल्याचें समजतें. पहिलें व्याख्यान येल विद्यापीठांतील प्रो. नॉरऑप ह्यांचें ' भारतीय संस्कृति ' ह्या विषयावर झालें. भारतामधील अमेरिकेचे माजी वकील मि. चेस्टर बोल्स हेहि एक व्याख्यान देणार आहेत.

**पाटबंधार्‍याची मोठी योजना**—उत्तर प्रदेशाच्या पूर्वभागांतील दुष्काळी प्रदेशांसाठीं एक मोठी पाटबंधार्‍याची योजना तयार करण्यांत येत आहे. योजना पुरी करण्यास ३,७३,३०,००० रुपये खर्च येईल आणि तीमुळें १,५०,००० एकर जमिनीला पाणी-पुरवठा होऊन १०,००,००० मण अधिक अन्नधान्य पिकूं लागेल.

**रशिअन शास्त्रज्ञांची उडी**—रशिअन शास्त्रज्ञ पृथ्वीभोंवतीं दोन तासांत प्रदक्षिणा करणारा एक रॉकेटवजा उपग्रह पृथ्वीपासून १०० मैलांवर सोडण्याचा प्रयत्न करीत आहेत, अशी माहिती एका अमेरिकन इंजिनिअरनें प्रकट केली आहे. ह्या उपग्रहावर राहून पृथ्वीवर उपयुक्त माहिती धाडतां येईल अशी त्यांची अपेक्षा आहे.

**कानडी टाइपरायटर**—तारीकेरी येथील एक वकील श्री. टी. एल. नारायणराव ह्यांनीं कानडी लिपीचा टाइपरायटर तयार केला आहे. ह्या टाइपरायटरवर त्यांनीं नुकतेंच कामहि करून दाखविलें. आपल्या टाइपरायटरवर कानडी टाइप करण्यासाठीं लिपींत बदल करावा लागत नाहीं असें त्यांचें म्हणणें आहे. आपल्या टंकलेखकाची उपयुक्तता पटविण्यासाठीं ते लवकरच कर्नाटकांत दौरा काढणार आहेत.

### पोलादासाठी जर्मन तज्ज्ञ

भारतांत एक नवा पोलादाचा कारखाना काढण्याचें मध्यवर्ती सरकारनें ठरविलें आहे. संकल्पित कारखान्याविषयीं सल्ला देण्यासाठीं दोन जर्मन कारखानदारांचे सल्ला तज्ज्ञ सध्यां भारतांत आले आहेत. भारतीय सरकारच्या उत्पादन-खात्याचे चिटणीस श्री. ए. के. चंदा हे जर्मन तज्ज्ञांशीं बोलणीं करीत आहेत. क्रुप्स आणि डिमॅग ह्या दोन कारखान्यांना सरकार २·१ कोटी रुपये फीदाखल देणार आहे. पोलादाच्या कारखान्यामधील उत्पादनाचा कार्यक्रम, उत्पादनाची पद्धत, तांत्रिक मदतीचा तपशील, इत्यादि विषयासंबंधीं चर्चा करण्यांत येत आहे. नवीन कारखाना कोठें काढावा ह्यासंबंधीं शिफारशीहि जर्मन तज्ज्ञच करणार आहेत. कारखाना काढण्यासाठीं एकूण भांडवल सुमारें ७१·२५ कोटी रुपये लागेल असा अंदाज करण्यांत आला आहे. खुद्द जर्मन कारखाने सुमारें ९·५ कोटी रुपये भांडवल घालतील असें समजतें. तथापि ही रक्कम अजून नक्की ठरलेली नाहीं. कारण, यंत्रसामुग्रीची किंमत जर्मनींत काय पडेल त्यावर जर्मन भांडवलाची रक्कम अंशतः अवलंबून आहे. त्याशिवाय जागतिक बँकेकडेहि २० कोटी रुपयांसाठीं मागणी करण्यांत येणार आहे. कारखान्याच्या यंत्रसामुग्रीसाठीं सर्व जगांतून टेंडर्स मागविण्यांत येणार आहेत. यंत्रसामुग्रीचा दर्जा, किंमत आणि ती केव्हां मिळणार ह्या बाबीवर कोणतें टेंडर स्वीकारावयाचें तें अवलंबून राहील. नवा संकल्पित कारखाना बिहारमध्यें काढावा कीं मध्य-प्रदेशांत काढावा, ह्यासंबंधीं वाद चालू आहे. मध्यप्रदेश सरकारनें कारखाना आपल्याच राज्यांत काढणें कसें योग्य आहे, ह्यासंबंधी माहिती सादर केली आहे. आतां हा प्रश्न जर्मन तज्ज्ञांच्या मदतीनें योग्य प्रकारें सोडविला जाईल असें दिसतें.

### रशिआंतील सार्वजनिक आरोग्याची व्यवस्था

भारतीय राज्य-परिषदेचे सभासद मेजर-जनरल सोखे हे व्हिएन्ना येथें भरलेल्या आंतरराष्ट्रीय डॉक्टरांच्या परिषदेला प्रतिनिधी म्हणून उपस्थित राहिले होते. रशिआंतील सार्वजनिक आरोग्यासंबंधीं त्यांनीं मुंबईत नुकतेंच एक व्याख्यान दिलें. त्यांतील कांहीं महत्त्वाचा भाग खालीं दिला आहे.

मेजर सोखे म्हणाले कीं १९२५ सालीं रशिआंत २५,००० डॉक्टर्स होते. आतां डॉक्टरांची संख्या ३,००,००० पर्यंत आली आहे. रशिआची लोकसंख्या सुमारें १८ कोटी आहे. म्हणजे सध्यां रशिआंत ६०० माणसामागें एक डॉक्टर आहे. दरवर्षीं २५,००० नवीन डॉक्टर्स शिक्षण घेऊन बाहेर पडतात. कोणत्याहि रोग्याला तज्ज्ञ डॉक्टरकडून उपचार करून घेण्यासाठीं २॥ मैलापेक्षा अधिक लांब जावें लागत नाहीं. प्रत्येक डॉक्टरला आपल्या विषयावर वर्षांतून ६ तरी व्याख्यानें द्यावीं लागतात. सार्वजनिक आरोग्याचीं केंद्रें ठिकठिकाणीं आढळून येतात व अशा प्रत्येक केंद्रांत डॉक्टरांना नेण्यासाठीं मोटारी तयार असतात. त्यामुळें खबर मिळतांच ३ मिनिटांत डॉक्टर रोग्याजवळ पोचूं शकतो. अधिक मोठ्या केंद्रांतून तर विमानेंहि तयार ठेवलेलीं असतात. डॉक्टर आणि रोगी ह्यांच्यांतील आपलेपणाहि चटकन् लक्षांत येतो. ह्या प्रगतीचीं कारणें पुढीलप्रमाणें सांगतां येतील. रशिआंतील उत्पादनांत १२ पट वाढ झालेली आहे; त्याचप्रमाणें प्रत्येक रशिअन नागरिक दुसऱ्या नागरिकाशीं आदरानें वागतो हेंहि एक कारण आहे. सरकारनें शिक्षणपद्धतीचा अतिशय कौशल्यानें उपयोग केला आणि लक्षावधि लोकांना शिकवून तयार केलें. रोग्यांची माहिती पुरविणारीं कार्डें डॉक्टर्स व रोगी दोघेहि जपून ठेवतात. त्यामुळें कामाला फार मदत होते.


**१९५० अखेरचें ११ वें यशस्वी मूल्यमापन**

**१९५० मध्येंही रु. २६५ लाखांवर नवीन विम्याचें पूर्ण काम.**

**वे स्ट र्न इं डि या**

**विमा कंपनीनें**

**आपलें सामर्थ्य, स्थैर्य व सेवा**

यासंबंधींची प्रचीति पुन्हां एकवार विमा जगतास आणून दिली आहे.

**दर हजारी त्रैवार्षिक बोनस**

| हयातींतील पॉलिसी | हयातीनंतरची पॉलिसी |
|---|---|
| रु. २७ | रु. ३३ |

कंपनीच्या वाढत्या वैभवांत सहभागी व्हा व सर्वोत्कृष्ट फायद्यासाठीं

**वेस्टर्न इंडियाची निवड करा.**

के. वाय. जोशी, बी. ए., एफ. आय. ए.

मॅनेजर

# वेस्टर्न इंडिया लाईफ

## इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा.

शाखा कचेरीः— शहर: १७९ बुधवार पेठ, लक्ष्मीरोड, पुणें. फोन नंबर— ३४०२

कँप: केअर-ऑफ क्रेसवेल्स ईस्ट स्ट्रीट, पुणें-१



# दि बेळगांव बँक लिमिटेड

**स्थापना १९३० : शेड्यूल्ड बँक**

**दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकमधील पहिली शेड्यूल्ड बँक**

शाखाः—संकेश्वर, होसूर (पो. शहापूर), गोकाक, कँप (बेळगांव), वेंगुर्लें, मालवण, चंदगड, गडहिंग्लज, रामदुर्ग, चिकोडी, नरगुंद, शिरोडा, चिपळूण, कणकवली, निपाणी, बैलहोंगल, मिरज, अथणी, देवगड, सावंतवाडी, ठळकवाडी (बेळगांव), सौंदत्ती.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | रु. | १,९०,००० |
| ठेवी | रु. | ७९,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ९२,९३,००० |

बेळगांव येथें बँकेच्या स्वतःच्या मालकीच्या इमारतींमध्यें अद्ययावत् पद्धतीचा सेफडिपॉझिट व्हॉल्ट १० एप्रिल, १९५२ पासून सुरू झाला.

**बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.**

जी. एल. गजेंद्रगडकर, चेअरमन.

ए. आर. नाईक, मॅनेजिंग डायरेक्टर.

एच. एस. कुलकर्णी, मॅनेजर.

# अर्थ

बुधवार, ता. २५ नोव्हेंबर १९५३





संस्थापक : प्रो. वामन गोविंद काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे


## आंध्रच्या फडणिसांचें भाषण

नुकत्याच निर्माण करण्यांत आलेल्या आंध्र राज्याचे फडणीस श्री. तेनती विश्वनाथम् ह्यांनीं कुर्नूल येथील सरकारी ट्रेनिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांच्या सामाजिक शास्त्रविषयक अभ्यास मंडळापुढें देशांतील आर्थिक परिस्थितीविषयीं एक उद्बोधक व्याख्यान दिलें. ते म्हणाले, कीं सध्यां आपल्यापुढें रहाणीच्या एकसारख्या वाढत्या खर्चाचा प्रश्न सगळ्यांत महत्त्वाचा आहे रहाणीच्या खर्चाचें मान अधिक वाढूं न देण्याविषयीं अर्थशास्त्रांतील तज्ज्ञांनीं उपाय सुचविले पाहिजेत. रहाणीच्या खर्चांत वाढ झाली म्हणून पगारांत वाढ केली तर रहाणीचा खर्च पुन्हा अधिकच वाढेल. तेव्हां हा मार्ग बरोबर नाहीं. महागाई दिवसेंदिवस झपाट्यानें वाढत चालली आहे, हें खरें आहे. अशा परिस्थितींत नोकरवर्गानें अधिक पगाराची मागणी अधिक करावी हें साहजिकच आहे. सरकार कर वाढवून अधिक पैसा गोळा करूं शकेल आणि नोकरांचे पगारहि वाढवूं शकेल. पण अशा रीतीनें हा प्रश्न सुटण्यासारखा नसल्यानें त्याचा विचार अधिक मूलग्राही पद्धतीनें झाला पाहिजे. सरकारी नोकरांच्या कार्यक्षमतेंत आणि शिक्षणांत दर्जाच्या दृष्टीनें कमतरता आली आहे, अशी तक्रार सर्वत्र करण्यांत येते. ह्या बाबतींत अधिक लक्ष घालण्याची जरूरी आहे हें तर खरेंच. पण नोकरांची कार्यक्षमता आणि शिक्षणाचा दर्जा ह्या दोन्ही गोष्टी आर्थिक परिस्थितीशीं निगडित असतात. लोकांना मिळणारें अन्न, त्यांना मिळणारा कपडा आणि इतर आर्थिक सवलती ह्यांच्यावर त्यांची कार्यक्षमता अवलंबून असते. अर्थातच, आर्थिक परिस्थिति सुधारणें हें पहिलें काम आहे.

## इजिप्तमध्यें बाजारपेठ आहे

श्री. मुरारजी वैद्य ह्यांच्या नेतृत्वाखालीं ७ जणांचें एक व्यापारी मंडळ नुकतेंच इजिप्तला गेलें होतें. तें आतां भारताला परत आलें आहे. मंडळाचे नेते श्री. वैद्य म्हणाले कीं, आपण अधिक कष्ट घेऊन आपला परराष्ट्रीय व्यापार संघटित केला तर इजिप्तमध्यें भारताला चांगली बाजारपेठ मिळूं शकेल. श्री. वैद्य हे इंडिअन कौन्सिल फॉर फॉरिन ट्रेड ह्या संस्थेचे अध्यक्ष आहेत. त्यांच्या मतानें इजिप्तला भारताशीं व्यापार करण्याची फार इच्छा आहे. परंतु इजिप्तमधील बाजारपेठ हस्तगत करण्यासाठी बऱ्याच प्रयत्नांची आवश्यकता आहे. इजिप्तमधील व्यापाऱ्यांना भारताकडून काय मिळूं शकेल ह्याविषयीं फारशी कल्पना नाहीं. तशी कल्पना त्यांना यावयाची असेल तर कैरो आणि अलेक्झांड्रा सारख्या मोठ्या शहरांतून भारतीय मालाचीं प्रदर्शनें भरविण्याची जरूर आहे. आज तरी अशी परिस्थिति आहे कीं, इजिप्तमधील धंदेवाल्यांना भारत हा फक्त शेतीप्रधान देशच वाटतो. भारताचा चहा इजिप्तमध्यें लोकप्रिय होण्यासारखा आहे. पण त्यासाठी प्रचार करण्याची आवश्यकता आहे. उदाहरणार्थ, चहापानाचीं गृहें मोठ्या शहरांतून उघडणें. भारताच्या कापडाला परदेशी बाजारपेठांची आवश्यकता आहे. इजिप्तकडून कापूस घेऊन त्याच्याबदला भारतानें कापड देऊं केलें तर उभय देशांत ऐनजिनसी व्यापार होऊं शकेल असें श्री. वैद्य ह्यांनीं सुचविलें आहे. त्याशिवाय भारताचे मसाल्याचे पदार्थ, भारतीय चित्रपट आणि यांत्रिक हत्यारें, इत्यादि मालाहि इजिप्तमध्यें खपूं शकेल असा त्यांचा अभिप्राय आहे.

## अणुशक्तीच्या मालकीचा वाद

पाश्चात्य राष्ट्रांत अणुशक्तीचा उपयोग उद्योगधंद्यांसाठी करण्याची वेळ जवळ येत चालली आहे. असा उपयोग होऊं शकत असल्यास तिची मालकी कोणाकडे असावी ह्यासंबंधी वाद उद्भवण्याचा संभव आहे. स्वीडननें मात्र हा प्रश्न आपल्यापुरता सोडविला आहे. अणुशक्तीचा अभ्यास करण्यासाठीं स्वीडननें एक कंपनी स्थापन केली आहे. कंपनीच्या भांडवलापैकी ५५टक्के भांडवल सरकारच्या मालकीचें असून उरलेलें इतर औद्योगिक संघटनांच्या मालकीचें आहे. ह्या पद्धतीनें खाजगी मालकीचे आणि सरकारी मालकीचे फायदे मिळूं शकतील, अशी सरकारची कल्पना आहे. एखादा निर्णय घ्यावयाचा झाल्यास सरकारला चर्चा करावी लागते व वेळ घालवावा लागतो. व्यापारी कंपनीला निर्णय अधिक जलद घेतां येतो. कंपनींत एकूण १७५ माणसें काम करतात. त्यापैकीं फक्त ७ जण व्यवस्थापकीय स्वरूपाचें काम करतात. उरलेले सर्वजण शास्त्रज्ञ अगर तंत्रज्ञ आहेत. अणुशक्तीच्या लष्करी बाजूकडे स्वीडन लक्ष घालीत नाहीं. स्वीडनमध्यें लोखंडाचा सांठा भरपूर आहे. परंतु कारखान्यांना लागणारें कोळशाचें अगर तेलाचें जळण मात्र नाहीं. म्हणून अणुशक्तीचा उपयोग कारखाने चालविण्यासाठी करण्याचे सरकारचे प्रयत्न चालू आहेत. त्या देशांत विजेची निर्मिति बरीच होते. पण १९७३ सालीं स्वीडनमधील वीज-निर्मिति जास्तींत जास्त होऊं लागेल. तरीहि कारखान्यांसाठी जळणाची चणचण भासेल, असा अंदाज करण्यांत आला आहे. कोळसा अगर तेल हें जळण बाहेरून मागवावयाचें झालें तर स्वीडनला बरीच किंमत द्यावी लागेल. हा प्रसंग टाळण्यासाठी अणुशक्तीचा उपयोग कारखाने चालविण्यासाठी करण्याचे प्रयत्न आतांपासून करण्यांत येत आहेत.

## दुःखद निधन

### कै. विठ्ठलराव देशपांडे

न्यू सिटिझन बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. द. दा. देशपांडे यांचे द्वितीय चिरंजीव श्री. विठ्ठलराव देशपांडे ह्यांना शनिवारीं (१४ नोव्हेंबर) रोजीं सायंकाळीं चार वाजतां माटुंग्याच्या कॉलनी नर्सिंग होममध्यें देवाज्ञा झाली. गेले जवळ जवळ अडीच महिने ते फुःफुसाच्या विकारानें (लंग ॲब्सिस) आजारी होते. गेल्या कांहीं वर्षांत बँकेच्या यच्चयावत व्यवहाराबाबत त्यांनीं सखोल ज्ञान मिळविलें होतें. त्यांच्या अपमृत्युमुळें बँकेचें तर अपरिमित नुकसान झालेंच, परंतु त्याहूनहि अधिक नुकसान श्री. भाऊसाहेब देशपांडे यांचें झालें आहे.

मृत्युसमयीं कै. विठ्ठलरावांचें वय अवघें तीस वर्षांचें होतें. त्यांच्यामागें त्यांच्या पत्नी व दोन मुलें आहेत. आम्हीं कुटुंबियांच्या दुःखांत समभागी आहोंत.

## शालेय शिक्षणास जिवंतपणा

### अमेरिकेंतील शालेय बचतीची योजना

अमेरिकेंतील मुलांना बालवयांतच काटकसरीचें महत्त्व समजतें. विचारपूर्वक बचत कशी करावी आणि स्वावलंबनाची व दूरदृष्टीची प्रवृत्ति कशी वाढवावी हें सर्व इयत्तांतील मुलांच्या मनावर ठसविण्यासाठीं शालेय बचतीच्या योजना आखल्या गेल्या आहेत. अमेरिकन सरकारच्या अर्थखात्याच्या " युनायटेड स्टेट्स सेविंग्ज स्टॅंप्स अँड बॉंडस " योजनेशीं शालेयबचतीच्या योजना संलग्न असल्यामुळें राष्ट्रीय सरकारच्या कामकाजाची विद्यार्थ्यांना अनायासें माहिती होते.

गणित, इतिहास, नागरिकशास्त्र, सामाजिक शास्त्रें, कौटुंबिक अर्थशास्त्र, कला व लेखन, अशा सर्व विषयांच्या अभ्यासांत काटकसरीचे धडे दिले जातात. " एक पै वांचविणें म्हणजे एक पै मिळविणें " अशा आशयाचीं बोधवचनें ( ए पेनी सेव्हड इज ए पेनी गेन्ड ) कित्त्यांच्या वह्यांत छापलेलीं असतात. इसापनीतींत उनाड टोळ व काटकसरी मुंगी यांची जी गोष्ट आहे तिचें नाट्यीकरण पहिल्या इयत्तेंतील मुलें करीत असतात. चलनवाढी मुळें किंमती कशा वाढतात आणि बचतीचीं तिकिटें व कर्जरोखे विकत घेतल्यानें बाजारांत खेळणारा जादा पैसा कसा ओढून घेतां येतो हें वरच्या वर्गांतील मुलांना शिकविण्यांत येतें.

२० वर्षांपूर्वी " पेनी बचतीच्या बँका " शाळकरी मुलांत काटकसरीची प्रवृत्ति वाढविण्यासाठी स्थापन करण्यांत आल्या. ( पेनी किंवा सेंट हें अमेरिकेंतील सर्वांत कमी किंमतीचें नाणें असून त्याची किंमत सुमारें पाऊण आणा असते ). लहान ठेवीदारांच्या काटकसरीच्या योजनेचा एक भाग म्हणून १९३५ साली प्रथमच अमेरिकन अर्थखात्यानें बचतीच्या तिकिटांची व कर्जरोख्यांची विक्री हातीं घेतली, आणि त्या उपक्रमाशीं सहकार्य करण्यासाठी शाळा दर आठवड्यास बचतीचीं तिकिटें खपविण्याचे कार्यक्रम ठेवूं लागल्या आणि मुलांना अधिक व्यापक प्रमाणांत काटकसरीचें शिक्षण देऊं लागल्या.

युद्धकाळीं या उपक्रमांना जोराची चालना मिळाली. अमेरिकन सरकारनें काढलेलीं बचतीचीं तिकिटें व कर्जरोखे यांच्या खरेदींत भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांची व शाळांची संख्या वाढत गेली. १९४१ सालीं ८,४०० शाळांतील सुमारें २५,००,००० विद्यार्थी त्या खरेदींत भाग घेत होते. १९४६ सालीं २,००,००० शाळांतील सुमारें २,५०,००,००० विद्यार्थी भाग घेऊं लागले. शाळकरी मुलांत सुमारें २,००,००,००,००० डॉलर किंमतीचीं युद्धकालीन बचतीचीं तिकिटें व कर्जरोखे खपलें. (१ डॉलर = म्हणजे सुमारें ४ रु. १२ आ.)

युद्धकालांत चालू केलेली शालेय बचतीची योजना विद्यार्थ्यांना काटकसरीचें महत्त्व पटविण्यास उपयुक्त आहे असें दिसून आल्यावरून युद्धानंतर शांतताकालीन बचतयोजना हातीं घेण्यांत आली. अमेरिकन अर्थखात्यानें युद्धानंतर शालेयबचतीचीं तिकिटें व कर्जरोखे यांची विक्री चालू ठेवण्याचें ठरविलें आणि शिक्षणखात्याच्या सहकार्यानें बचतीच्या शिक्षणाचीं शालेय साधनें तयार केलीं.

यासाठीं मुद्दाम तयार केलेल्या वह्या विद्यार्थ्यांना देण्यांत येतात. पैशाच्या व्यवहारासंबंधीं गणिताचीं उदाहरणें, नाणीं व चलन यांची माहिती, अंदाजपत्रकाचे नमुने, तिकिटविक्रीसंबंधीं स्मरणचिठ्या, प्रसिद्धि फलक, चलत्‌चित्रपट, नाट्यप्रयोग, खेळ व गाणीं या सर्वांचा त्या शक्षणिक कार्यक्रमांत अंतर्भाव केला जातो.

वर्गांत मिळणारें बचतीचें शिक्षण, विद्यार्थ्यांनीं चालविलेल्या बँका व सरकारी बचतीच्या तिकिटांची व कर्जरोख्यांची खरेदी, यांमुळें काटकसरीच्या शिक्षणाची प्रगति होत आहे. पेनींच्या बचतीपासून सुरुवात करून विद्यार्थी आतां व्यक्तिगत अंदाजपत्रकें तयार करूं लागलें आहेत आणि सरकारी जमाखर्चाचा अभ्यास करूं लागलें आहेत.

पैशाचा सदुपयोग कसा करावा, भरमसाट खरेदी कशी टाळावी, खेळांचीं साधनें, दुचाक्या, सुटींतील सहली यांसाठी, कॉलेजच्या खर्चासाठीं किंवा नवीन धंदा सुरू करण्यासाठीं शिल्लक कशी टाकावी, याची माहिती विद्यार्थ्यांना दिली जाते. काटकसरीच्या संवईमुळें व्यक्तीला स्वतःच्या आर्थिक स्थैर्याची खात्री वाटूं लागते आणि परिणामीं लोकशाही पद्धतीनें चाललेल्या राष्ट्राचें सामर्थ्य व स्थैर्य वाढतें, या सिद्धांतावर काटकसरीच्या सर्व योजनांत भर दिला जातो.

हजारों शाळांत तर आठवड्यास शालेयबचतीचा दिवस पाळला जातो. त्या प्रसंगीं पैशाचे प्रत्यक्ष व्यवहार करून विद्यार्थी काटकसरीची व स्वावलंबनाची उपयुक्तता पटवून घेतात. विद्यार्थी शालेय बँका चालवितात आणि तिकिटें व कर्जरोखे यांची विक्री करतात. या कामीं शिक्षकांना सारखें लक्ष घालावें लागत नाहीं. बँकांच्या व्यवस्थेचा अभ्यास करून विद्यार्थी स्वतःमधूनच अधिकाऱ्यांची निवड करतात. कर्जरोखे काढण्यासाठीं ते स्वतःची कंपनी काढून चालवितात आणि विद्यार्थ्यांचे हिशेब बिनचुक कसे ठेवावे हें शिकतात. त्या अनुषंगानें ते बिम्याच्या व्यवहाराचीहि माहिती मिळवितात. मोठे विद्यार्थी कॅशियर, सराफ व हिशेबनीस अशीं कामें करतातच, किंडरगार्टन वर्गांतील बालकें देखील तिकिटें व कर्जरोखे खपविण्याचें काम करतात.

बचतीचीं तिकिटें व कर्जरोखे यांच्या मागण्या तपासतांना जमा झालेल्या पैशांचा हिशेब ताडून पहातांना, विक्रीच्या तपशीलाचा तक्ता तयार करतांना व अहवाल लिहितांना विद्यार्थ्यांचें गणिताचें कौशल्य कसाला लागतें. खरीं नाणीं मोजणें, खरेदीविक्रीचे खरे कागदपत्र तपासणें आणि बचतीचीं खरीं तिकिटें विकणें यांनीं जें शिक्षण मिळतें तें गणिताच्या उदाहरणांतील केवळ लुटुपुटीच्या गव्हाच्या पायल्यांनीं किंवा अंड्यांच्या डझनांनीं मिळणें शक्य नाहीं. खपलेल्या तिकिटांची संख्या व वर्गांतील विद्यार्थ्यांची संख्या यांची तुलना करून विद्यार्थ्यांना शेकडेवारीच्या उदाहरणांचें रहस्य जसें समजतें तसें काल्पनिक उदाहरणांनीं समजत नाहीं.

अमेरिकेंतील आरंभींच्या वसाहतवाल्यांचें व जगांतील इतर लोकांचें जीवन कसें काटकसरीचें होतें हें इतिहासाच्या अभ्यासांत सांगितलें जातें. बेंजामीन फ्रँकलिन सारख्या थोर व्यक्तींचीं चरित्रें वाचतांना चरित्रनायकांनीं पैशाचा व वेळेचा सदुपयोग कसा केला इकडे विद्यार्थ्यांचें लक्ष वेधलें जातें.

आरोग्यशास्त्र व कौटुंबिक अर्थशास्त्र या विषयांच्या वर्गांत दांत भरून घेणें किंवा जोडे दुरुस्त करून घेणें अशा आवश्यक बाबतींत पैसा खर्च करणें कसें शहाणपणाचें असतें हें सांगितलें जातें.

शालेय बचतीच्या कार्यक्रमाची प्रसिद्धि करण्यासाठी विद्यार्थी स्वतंत्र पद्यें रचतात, नाट्य लिहितात, भाषणें करतात, फलक

लावतात व चर्चा करतात, आणि या मार्गानें विद्यार्थ्यांना आपलें कौशल्य व बुद्धिमत्ता यांचा उपयोग करण्याची संधि मिळते.

सरकार आपल्या खर्चासाठी पैसा कसा उभा करतें, तें पैशाची व्यवस्था कशी ठेवतें, त्या पैशानें तें कोणकोणतीं लोकोपयोगी कामें कसकशीं करतें, वगैरे बाबींना नागरिकशास्त्राच्या वर्गांत जिवंतपणा येतो. शालेयबचतीच्या कार्यक्रमानें आपण सरकारच्या उत्पन्नाला हातभार लावला आहे ही जाणीव विद्यार्थ्यांना असल्यामुळें असल्या विषयांत केवळ पुस्तकी दृष्टि न राहतां त्यांत व्यवहारी दृष्टि येते.

---

### हातमागाच्या धंद्याला मदत

हातमागावर कापड काढणाऱ्या विणकरांना मदत करण्यासाठी मुंबई सरकारनें २२,००,००० रुपयांची रकम मंजूर केली आहे. आर्थिक संकटांत सापडलेल्या विणकरांना साह्य करण्यासाठी एक योजना आंखण्यांत आली आहे. धारवाड जिल्ह्यांतील १६ विणकरांच्या केंद्रांना योजनेप्रमाणें मदत करण्यांत येणार असून तीमुळें बंद पडलेले २००० हातमाग पुन्हा चालू होतील. हीं सर्व केंद्रें सहकारी संस्थांनीं चालविलेलीं आहेत. ह्या संस्थांमार्फतच विणकरांना सुमारें २,००,००० रुपयांचीं कर्जें देण्यांत येणार आहेत. कर्जाऊ देण्यांत येणाऱ्या रकमेपैकी ९५,००० रुपयांच्या रकमेला मंजुरी मिळाली असून ती वाटण्याचें काम चालूहि झालें आहे. हातमागाच्या धंद्याला वाईट दिवस येण्याचीं कारणें पुष्कळ असलीं तरी त्यांतील एक इतरांपेक्षा अधिक स्पष्ट स्वरूपाचें आहे. हातमागावर ज्या प्रकारचें कापड काढण्यांत येत असे त्या प्रकारच्या मालाला सध्या मागणी नाहीं, हें तें कारण होय. एकाच प्रकारच्या मालाचें परंपरागत उत्पादन केल्यामुळें ही आपत्ति ओढवली आहे. म्हणून, धारवाड जिल्ह्यांतील विणकर सहकारी संस्थांनीं नवीन प्रकारचा माल काढण्याचें ठरविलें आहे, असें समजतें. तलम आणि अति तलम धोतरें, शर्टिंग इत्यादि प्रकारचा माल आतां काढण्यांत येणार आहे. कांहीं सहकारी संस्थांनीं विणकरांना मदत करण्यासाठी त्यांचा सर्वच शिलकी माल एकदम विकत घेण्याची तयारी दर्शविली आहे. कांहीं संस्थांनीं विणकरांच्या मालाच्या विक्रीची व्यवस्था आपणाकडे घेतली आहे. विणकरांचा धंदा आर्थिक संकटांत सांपडल्यावर त्यांना मदत करण्याचे सरकारी व सहकारी प्रयत्न इष्टच आहेत. परंतु त्यामुळें विणकरांचा प्रश्न कायमचा सुटेल किंवा कसें हें सांगणें कठीण आहे.

---

**साखरेची टंचाई चालूच**—ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यांत विशाखापट्टम् येथें साखरेचा तुटवडा पडला होता. कांहीं दुकानांतून मात्र ती चढ्या किंमतीला विकत मिळत होती. विजग आणि श्रीकाकुलम् ह्या जवळच्याच जिल्ह्यांत साखरेचे कारखाने असतांनाहि टंचाई पडल्यामुळें आश्चर्य निर्माण झालें आहे. साखरेच्या कारखानदारांचें म्हणणें असें आहे कीं, कारखान्यांजवळ सांठा असूनहि तो विकण्याची परवानगी मिळालेली नाहीं.

**मोती काढण्यासाठी भांडण**—समुद्रांतून मोती काढण्याबाबत ऑस्ट्रेलिआ व जपान ह्यांच्यांत चालू असलेलें भांडण आपण हेग येथील आंतरराष्ट्रीय कोर्टापुढें नेणार असल्याचें जपानच्या परराष्ट्रीय कचेरीनें जाहीर केलें आहे.

SAVE to help yourself and the NATION,
WITH THE
HOME SAFE



THE SARASWAT CO-OPERATIVE BANK LTD.
GIRGAON, BOMBAY.
Branches: Dadar, Mahim, Poona & Belgaum

### अमळनेर को. अर्बन बँक लि.,

अहवालाचे वर्षी बँकेकडील ठेवींत दुष्काळी परिस्थितींतहि ३,०३,९३१ रु. ची वाढ होऊन त्याची रकम ११,४८,३२२ रु. झाली. थकीत कर्जाचें एकूण कर्जाशीं प्रमाण २·४६% चें २·९% झालें आहे. बँकेच्या मालकीच्या इमारतीचें दुसऱ्या मजल्याचें कामहि आतां पूर्ण झालें आहे. सेफ डिपॉझिट व्हॉल्टची लोकप्रियता वाढत आहे. बँकेस नफा १४,८९८ रु. झाला व भागीदारांस ६½% डिव्हिडंड मिळालें. (चेअरमन : मणीलाल भागचंद्र शेट गुजराथी. मॅनेजर : बळवंत गणेश चितळे, बी. ए., एलएल. बी.).

### कल्याण पीपल्स को. बँक लि.

शेअर भांडवल ३,१०,६४० रु., रिझर्व्ह व इतर फंड २,७६,८११ रु., ठेवी ७,६३,९१९ रु., खेळतें भांडवल २५,०९,६११ रु., रोखे व बँकांत १,८१,१४७ रु., शेअर्स व रोखे ५,१०,०५० रु., येणें कर्जें १७,३२,३०२ रु. असे ह्या बँकेच्या ताळेबंदांतील प्रमुख आंकडे आहेत. शाखेचें कामकाज समाधानकारक चाललें आहे. अंबरनाथ येथें १५ ऑगस्ट रोजीं शाखा सुरू केली आहे. "स्पेशल सेव्हिंग डिपॉझिट" व "रिकरिंग डिपॉझिट" ह्या दोन नवीन योजना बँकेनें सुरू केल्या आहेत. बँकेस २४,५४५ रु. नफा झाला व भागीदारांना ४% डिव्हिडंड दिले. (चेअरमन : दौलतराव जयरामराव झुंजारराव. मॅनेजर ; बाळकृष्ण बाबुराव रुद्रभटे.)

### दि चाळिसगांव पीपल्स को. बँक लि.

शेअर भांडवल ९०,४०० रु.; रिझर्व्ह व इतर फंड ५०,८३२ रु.; ठेवी २,६७,७०३ रु.; हातांत व बँकेंत शिल्लक १,७४,१९० रु.; इन्व्हेस्टमेंट १८,५८४ रु.; कर्जें २,१९,९५० रु. असे ह्या बँकेच्या ताळेबंदांतील प्रमुख आंकडे आहेत. सभासदांची संख्या वाढून ती १०१६ झाली आहे व भाग–भांडवलांतहि वाढ दिसत आहे. नफावाटणीस ५,६९४ रु. आले. ६% डिव्हिडंड देण्यांत आलें. (प्रेसिडेंट : दाजी काशीनाथ भंडारी. मॅनेजर : श्री. ए. डी. पाटील).

### दि पैसाफंड शेतकी सहकारी बँक लि., हुपरी

ह्या बँकेची स्थापना २६–१–५० रोजीं, पहिल्या प्रजासत्ताक दिनीं, झाली. बँकेचें शेअर भांडवल ४३,२३७ रु. असून खेळतें भांडवल २,१८,३२९ रु. आहे. गेल्या वर्षासाठी बँकेनें ५% डिव्हिडंड दिलें आहे. धान्य व कापड विभाग, शेती विभाग, मिशी शाखा, इत्यादि बँकेच्या शाखा आहेत. सुरुवातीपासूनच बँकेस "अ" वर्ग मिळाला आहे.

(चेअरमन : एल. वाय्. पाटील. मॅ. डायरेक्टर : आ. बा. नाईक.)

### अलाहाबाद येथील वस्तुसंग्रहालय

अलाहाबाद येथील वस्तुसंग्रहालयाची नवी इमारत आतां पुरी होत आली आहे. इमारतीला १८ लाख रुपये खर्च येईल असा अंदाज करण्यांत आला होता. वस्तुसंग्रहालयांतील पुराण वस्तु शाखेच्या इमारतीला २ लाख रुपये खर्च आला असून त्यापैकी ३५,००० रुपये उत्तर प्रदेश सरकारनें दिले आहेत.

### हौशी प्रवाशांचा सोय

अजंठा आणि वेरूळ येथील प्रसिद्ध लेणी पहाण्यास जाणाऱ्या हौशी प्रवाशांची सोय करण्यासाठी मध्य रेल्वेनें मुंबई तें औरंगाबादपर्यंत जाणारे खास डबे जोडण्याचें ठरविलें आहे. मुंबईहून निघणाऱ्या हौशी प्रवाशांसाठी सवलती देण्याचा विचार रिजनल टूरिस्ट ॲडव्हायसरी कमिटीनें केला.

### बेकारांसाठी काम

उत्तर प्रदेश सरकारनें बेकारांना काम देण्यासाठी नैनिताल मोंवतालच्या डोंगराळ भागांतील औषधी वनस्पति त्यांच्याकडून गोळा करविण्याचें ठरविलें आहे. ६० निरनिराळ्या प्रकारच्या वनस्पति व मत्तें त्यांनीं चालू वर्षांत जमा करावयाच्या आहेत. औषधी वनस्पतींची किंमत सुमारें १,२५,००० रुपये होईल आणि हा व्यवसाय करून २७,००० माणसें त्यांच्या उत्पन्नांत थोडीफार भर घालूं शकतील.

### इंदूर येथें हरिजन कॉलनी

इंदूर येथें निर्वासित हरिजनांची एक वसाहत स्थापन करण्यासाठी भारतीय सरकारनें मध्यभारत सरकारला ४ लाख रुपयांचें कर्ज मंजूर केलें आहे, असें समजतें. ही रक्कम निर्वासितांनीं स्थापन केलेल्या एका सहकारी सोसायटीला देण्यांत येणार असून ती संस्था २०० घरें बांधणार आहे. "जयरामदास निर्वासित नगर" असें नांव वसाहतीला देण्यांत येईल.


### चिनी मुलें लवकर वाढतात

मलाया विद्यापीठानें आहारशास्त्र-विषयक एक अहवाल प्रसिद्ध केला आहे. ह्या अहवालांत असें सिद्ध करण्यांत आलें आहे कीं मलायांतील हिंदी मुलांच्यापेक्षा चिनी मुलें अधिक झपाट्यानें वाढतात. अहवाल तयार करणाऱ्यांनीं ४,२०० च्या वर निरीक्षणें केलीं. २५० चिनी व द. हिंदुस्थानी मुलांच्या संबंधीं निरीक्षणें करण्यांत आलीं. सर्व मुलें एक वर्षाच्या आंतील होतीं.


गंधर्व नाटक मंडळीचा
मखमलीचा पडदा
डाळिंबी रंगाचा ( १७×२६ चे ) २ तुकडे
योग्य किंमत आल्यास विकणेचे आहेत. गरजूंनीं
प्रो. महाराष्ट्र भुवन, बेळगांव
येथें चौकशी करावी.

कण आणि क्षण
( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )
लेखक : श्री. श्री. वा. काळे, संपादक "अर्थ"
".कणाकणाचा आणि क्षणाक्षणाचा योग्य विनियोग करण्याचा." 'कर्मयोग' सर्वांनीं शिकावयास हवा. त्या कर्मयोगाचे सुबोध धडे श्री. श्री. वा. काळे ह्यांनीं सोप्या भाषेंत आणि मार्मिक पद्धतीनें दिले आहेत. त्यांचें पुस्तक मला आवडलें.
—ना. सी. फडके
★
"या पुस्तकाचें वाचन करून त्यांत चित्ताकर्षक पद्धतीनें दिलेल्या सूचनांचें अनुकरण करणारें माणूस खरोखर व्यवहार-चतुर, लोकप्रिय आणि सुखी झाल्याशिवाय रहाणार नाहीं."
—चिं. वि. जोशी
★
"*वाचकांच्या मनरंजनाबरोबर त्यांच्या विचारांत महत्त्वाची भर घालणारें पुस्तक.*"
—शं. वा. किर्लोस्कर
पृ. सं. १६८ : : किं. २॥ रु.
१ "अर्थ", पुणें ४. ट. ख. ४ आ.
२ ग. वा. देवधर, एलिस ब्रिज, अहमदाबाद.

दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.
—पुणें शाखा—
१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.
आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.
एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :
ब्रँच सेक्रेटरी.

किर्लोस्कर
पॉवरवर चालणारे

"शरद चरक"
उसाचे चरक

वसंत नं. ३ चरक
हंगाम नजीक आला!
—सविस्तर माहितीसाठी आजच लिहा.—
किर्लोस्कर बंधु लि., किर्लोस्करवाडी, (जि. द. सातारा)

## क्लिअरिंग हाउसेस, त्यांतील चेक्स व त्यांची रक्कम
(संख्या हजारांची; रुपये लाखांचे)

| | | | मुंबई | कलकत्ता | दिल्ली | कानपूर | मद्रास | बंगलोर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मासिक सरासरी | १९४८–४९ | संख्या | ७६१ | ५४२ | ७२ | ४४ | २१६ | ४५ | १६,८१ |
| | | रक्कम | २२८,२१ | २२१,२७ | १२,३९ | ११,७० | ३३,५० | ५,७३ | ५१२,८१ |
| | १९५१–५२ | संख्या | ८८१ | ५८० | ११४ | ५१ | २७६ | ६२ | १,९६४ |
| | | रक्कम | २५३,२६ | २७१,२१ | १३,८५ | १२,१५ | ३९,५७ | ७,१६ | ५९७,२० |
| | १९५२–५३ | संख्या | ९०७ | ५९२ | १२९ | ६२ | २९८ | ६३ | २,०५१ |
| | | रक्कम | २१७,८३ | २०७,९९ | १३,२५ | ११,५३ | ३४,७५ | ६,५१ | ४९१,८६ |

| | | | कांहीं इतर केंद्रें | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अहमदाबाद | अमृतसर | कोइमतूर | हैद्राबाद | कोझिकोड | लखनौ | मदुराई | नागपूर | न्यू दिल्ली | पुणे | राजकोट | इतर १२ केंद्रें | एकूण |
| मासिक सरासरी | १९४८–४९ | संख्या | ७२ | १६ | १५ | | ७ | २३ | ८ | १८ | ४२ | २३ | १३ | ५३ | २९० |
| | | रक्कम | १९,४७ | २,२९ | २,७४ | | ९८ | १,९८ | १,३४ | २,५६ | ३,६८ | १,६५ | २,२१ | ५,६८ | ४४,५८ |
| | १९५१–५२ | संख्या | ८५ | २५ | १८ | १२ | ९ | २९ | ११ | २० | ६३ | ३२ | १३ | ५९ | ३७६ |
| | | रक्कम | २६,२९ | २,७९ | ३,४५ | ३,३४ | १,४४ | २,५३ | १,५८ | २,७२ | ४,९५ | २,२६ | १,८९ | ६,११ | ५९,३५ |
| | १९५२–५३ | संख्या | १०४ | ३२ | १९ | १२ | ८ | २६ | १३ | २२ | ७० | ३३ | १३ | ७२ | ४२४ |
| | | रक्कम | २२,११ | २,८५ | २,८५ | ४,३७ | १,२७ | १,९५ | १,५८ | २,६४ | ५,४८ | २,०० | १,५६ | ७,०१ | ५५,६७ |

## भारत सरकारचीं ट्रेझरी बिलें

ट्रेझरी बिलांची मुदत तीन महिन्यांची असते. लोकांना तीन महिन्यांनीं दर्शनी किंमत मिळावयाची असते, त्यासाठीं आज त्यांनीं जास्तींत जास्त किती रक्कम सरकारला द्यावी, ह्याबद्दल टेंडरें मागविण्यांत येतात. पैशाच्या बाजारभावाप्रमाणें, दरसाल दर शेंकडा कांहीं डिस्कौंटनें लोक ट्रेझरी बिलें विकत घेतात. उदाहरणार्थ, रिझर्व्ह बँकेचें पत्रक खालीलप्रमाणें असूं शकतें. "रिझर्व्ह बँकेनें एक कोटी रुपये किंमतीच्या तीन महिने मुदतीच्या ट्रेझरी बिलांसाठीं टेंडरें मागविलीं होतीं; तीं गेल्या २६ तारखेस उघडण्यांत आलीं. तेव्हां, एक कोटि, नऊ लक्ष रुपयांची मागणी होती, असें दिसून आलें. त्यांपैकीं एक कोटि रुपयांची टेंडरें स्वीकारण्यांत आलीं व त्यावर सरासरीनें द. सा. द शें. १ रु. १२ आ. इतकें व्याज पडतें." १९४८–४९ मध्यें व्याजाचे दर अगदीं कमी होते, तेव्हां ७ आ. ११ पै ह्या अल्प दरानें सरकारला ट्रेझरी बिलांच्या द्वारां कर्ज उभारतां आलें; १९५२–५३ मध्यें तोच दर २ रु. ३ आ. ७ पै इतका पडला, हे सोबतचा तक्ता दर्शवितो.

मध्यवर्ती सरकारनें रिझर्व्ह बँकेला विकलेल्या ट्रेझरी बिलांची रक्कमहि तक्त्यांत दर्शविली आहे. भारत-ग्रेट ब्रिटन आर्थिक करारप्रमाणें, भारत सरकारनें त्याच्या मालकीचे कांहीं ब्रिटिश सरकारचे रोखे त्या सरकारच्या नांवें करून दिले. त्यांची जागा भरून काढण्यासाठीं "ॲड हॉक" ट्रेझरी बिलें निर्माण करण्यांत आलीं, व वरचेवर रिन्यू करण्यांत आलीं, त्यांचाहि समावेश "रिझर्व्ह बँकेस विकलेलीं ट्रेझरी बिलें" ह्यांत होतो. चलन वाढवितांना रिझर्व्ह बँकेस कायद्याप्रमाणें जें तारण लागतें, तें ह्या ट्रेझरी बिलांनीं सोइस्कर रीतीनें निर्माण करतां येतें.

### भारत सरकारचीं ट्रेझरी बिलें
(हजार रुपयांचे आंकडे)

| | टेंडर्स मागवून विकलेलीं ट्रे. बिलें | डिस्कौंटचा द. सा. द. शें. दर | रिझर्व्ह बँकेस विकलेलीं ट्रे. बिलें | ट्रेझरी बिलांपोटीं एकूण देणें |
|---|---|---|---|---|
| १९४८–४९ | ४६,००,५० | ०–७–११ | १,११७,८५,०० | ३५०,४६,५० |
| १९५२–५३ | ४२,००,०० | २–३– ७ | १,२३३,०८,७५ | ३१५,२९,०० |

**मणिपूर येथें संगीताची शाळा**—मणिपूर (आसाम) येथें नृत्य व संगीत शिकविण्याची एक शाळा काढण्याचें भारतीय सरकारनें ठरविलें आहे. शाळा बहुधा चालू वर्षअखेर चालू होईल आणि तींत वन्य टोळ्यांचें संगीत व नृत्यहि शिकविलें जाईल.

---

**ब्रिटिश विमान-कंपन्यांची खर्चांत बचत**—ब्रिटिश वैमानिक कंपन्यांचे कांहीं लोकप्रिय मार्ग सोडले, तर इतर मार्गांनें प्रवास करणाऱ्या लोकांची संख्या खूपच कमी झाली आहे. ह्या अनपेक्षित मंदीमुळें कंपन्यांचे चालक खर्चांत बचत करण्याचें ठरवीत आहेत.

---

**पोलंडकडून साखरेची खरेदी**—पाकिस्तान सरकारनें पोलंडकडून १५,००० टन साखर खरेदी करण्याचा करार केला आहे, असें अधिकृत रीत्या समजतें.

---

## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

—पुणें शहर—

लक्ष्मी रोड

पोस्ट बॉक्स नं. ५११ ] [ टेलिफोन नं. २४८१

भोर, पौड व वडगांव ( मावळ ) येथें बँकेनें आपल्या नवीन शाखा-कचेऱ्या उघडल्या आहेत. येथें व इतर शाखांतहि सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार व सहकारी सोसायट्यांना शेतीसाठी कर्जें देणें, सोनें-चांदीचे तारणावर कर्जें देणें, वगैरे व्यवहार सुरू केले आहेत.

चालू, सेव्हिंग्ज ठेवी स्वीकारल्या जातात.

अेक ते दहा वर्षें मुदतीच्या ठेवीहि स्वीकारल्या जातात.

१ वर्ष २ टक्के, २ वर्षें २॥ टक्के, ५ वर्षें ३ टक्के, ७ वर्षें ३॥ टक्के, १० वर्षें ४ टक्के. याशिवाय रुपये २५,००० अगर पुढील रकमा ३ ते ६ महिने मुदतीनें घेण्यांत येतात.

दराबद्दल समक्ष चौकशी करावी.

वरीलप्रमाणें सर्व व्यवहार पुणें येथें मुख्य कचेरींत व इतर शाखांमध्यें होत असून त्यासेरीज पुणें येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्ट्स व सेफ कस्टडीची सोय आहे. त्याचा फायदा खातेदारांनीं घ्यावा.

जास्त माहितीसाठीं लिहा अगर समक्ष भेटा.

मो. वि. रवडे,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.

शाखा:—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७१,६०० |

### बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी. — श्री. बा. ग. धंदुके.

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:—बुधवार घ. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी, अ. मॅनेजर. — एम. व्ही. पांडव, मॅनेजर

## दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना १९११

मुख्य कचेरी : ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

टेलिफोन नं. २५४६१, ३१,६८६ | पोस्ट बॉक्स नं. ४७२, तारेचा पत्ता : फार्मबँक

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

भरपाई झालेलें भांडवल

| | |
|---|---|
| भागीदारांतर्फे | रु. ३३,९९,१५० |
| मुंबई सरकारतर्फे | रु. २६,००,००० |
| | रु. ५९,९९,१५० |
| गंगाजळी व फंड | रु. ५४,३३,९०० |
| ठेवी | रु. ९,२५,२६,५०० |
| खेळतें भांडवल | रु. १२,२९,०२,८०० |

### १६ जिल्ह्यांमध्यें ६७ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

वा. पु. वर्दे
ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर.

## पुणें जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ लि.

११५।११६ भवानी पेठ, गूळ आळी, पुणें २.

तारेचा पत्ता:—सॅनको सोप. टेलिफोन नं. ३११५

( जिल्ह्यांतील शेतकरी व नागरी जनतेस दैनंदिन गरजेच्या वस्तु पुरविणें व शेतकऱ्यांचा माल किफायतशीर विकून देणें, या उद्देशानें स्थापन झालेली जिल्ह्यांतील मध्यवर्ती संस्था )

संस्थेकडे खालीलसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

★ शेतीचीं सर्व प्रकारचीं अवजारें, ऊंस गाळण्याचे चरक; सल्फेट व इतर खतें; पिकांच्या रोगांवरील औषधें, पेंड.

★ शेतकी खात्यामार्फत जिल्ह्यांत होणारें पेंड, खतें व मिक्श्चर यांचें वांटप या संस्थेमार्फतच करण्यांत येतें.

★ पुणें जिल्हा ग्रामसुधारणा मंडळाच्या विद्यमानें चालू असलेल्या नियंत्रित लोखंड, सिमेंट वांटप योजनेंतील—गार्ड्यांचे आंस, धांवपट्ट्या, नळीचे पत्रे, प्लेन पत्रे, वगैरे व सिमेंट.

★ ग्राहक सहकारी संस्थांना लागणारा माल संघाच्या अडत दुकानामार्फत पुरविला जातो.

★ शेतकऱ्यांचा शेतीचा माल संस्थेच्या अडत दुकानामार्फत पुणें येथील बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जातो.

★ जिल्ह्याबाहेरील शेतकरी व सहकारी संस्था यांचा माल पुणें बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जाईल.


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ), पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.